MHGO040006422018

नि.दि.दा.क्र. ३८/२०१८
दक्षाबेन सुरेशभाई पटेल
विरुध्द
मुस्ताक ईसाक शेख

## नियमित दिवाणी दावा क्रमांक ३८/२०१८ मधील निशाणी ५५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या कथनानुसार दावा मिळकती या वादीने खरेदी केलेल्या आहेत. परंतु प्रतिवादी याने वाद मिळकतीमध्ये खड्डे काढून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. तसेच प्रतिवादी हा सदर मिळकतीमध्ये बांधकाम करीत आहे. प्रतिवादीने वाद मिळकतीवर अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे सदरचे प्रतिवादीचे अतिक्रमण हुकूमी ताकीदीद्वारे काढणे गरजेचे आहे. वादीने दाव्यामध्ये अतिक्रमण काढून मिळण्याबाबत हुकूमी ताकीद मागीतलेली आहे. परंतु वादीने मिळकतीचा ताबा मागीतलेला नाही. त्यामुळे परिच्छेद क्र. ८–ब हा अर्जात नमुद केल्याप्रमाणे नव्याने नमुद करणे गरजेचे आहे. तसेच दाव्याच्या विनंतीमध्ये अ–२ नव्याने नमुद करून ताबा मिळण्याची मागणी करणे गरजेचे आहे. सबब अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी याने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून प्रस्तुतचा अर्ज नाकारला. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा दावा हा वादीच्या साक्षीदाराच्या उलटतपासाकरीता प्रलंबीत आहे. प्रस्तुतचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. प्रस्तावीत दुरुस्ती ही वादीला दावा पुराव्यावर नेमण्याचे पुर्वी करणे शक्य होते. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने हुकूमी मनाई आदेशाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतकामी निशाणी २२ वर मुद्दे निश्चीत झालेले असुन प्रस्तुतचे प्रकरण

हे वादीच्या साक्षीदाराच्या उलटतपासाकरीता प्रलंबीत आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील तरतुदीनुसार प्रस्तावीत दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांच्यातील वादप्रश्न योग्यप्रकारे निर्गमित करण्याकरीता आवश्यक आहे किंवा कसे व प्रस्तावीत दुरुस्ती ही वादीला दावा पुराव्यावर नेमण्याचे पुर्वी करणे शक्य होते किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे.

४. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता वादीच्या कथनानुसार त्याने हुकूमी मनाई आदेश मिळण्याची विनंती केलेली आहे परंतु ताबा मागीतलेला नाही. वादीच्या कथनानुसार अतिक्रमण करून केलेले बांधकाम काढून त्या जागेचा कब्जा वादीला मिळणे गरजेचे आहे. वादीच्या प्रस्तावीत दुरुस्तीचे स्वरुप पाहता वादी हा दाव्यामध्ये असलेल्या त्याच्या मागणीच्या अनुषंगाने पुढील मागणी करत आहे. वादीने यापुर्वीच दाव्यामध्ये दुरुस्ती करून हुकूमी मनाई आदेश मागीतलेला आहे व दावा मिळकतीमधील बांधकाम काढून मागीलेले आहे. परंतु वादीने सदर मिळकतीची ताबा मागीतलेला नाही. त्यामुळे प्रस्तावीत दुरुस्ती ही दाव्यामध्ये असलेल्या मागणीच्या अनुषंगाने संयुक्तीक दिसून येत आहे.

५. परंतु सदरची दुरुस्ती ही वादीला यापुर्वीच दावा पुराव्यावर नेमण्याचे आधी मागणे शक्य होते. वादीने प्रस्तावीत दुरुस्ती ही दावा पुराव्यावर नेमण्याचे पूर्वी का मागीतली नाही याबाबत कोणतेही स्पष्टीकरण वादीने दिलेले नाही. परंतु प्रस्तावीत दुरुस्ती ही दाव्यामध्ये असलेल्या मागणीच्या अनुषंगाने संयुक्तीक दिसून येत असून सदर प्रस्तावीत दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही. याउलट प्रस्तुत दाव्यातील वाद विषय योग्यप्रकारे निर्गमित होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नैसर्गीक न्यायतत्वाचा विचार करता दावा पुराव्यावर नेमल्यानंतर प्रस्तुतची प्रस्तावीत दुरुस्ती करण्यास वादीला परवानगी देणे न्यायोचीत दिसून येत आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादी याचा प्रस्तुतचा अर्ज (निशाणी ५५) हा रक्कम रुपये ३००/– चा खर्च प्रतिवादी याला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादी याने खर्चाची रक्कम अदा करून मागणी केल्याप्रमाणे मुळ दाव्यामध्ये दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्त दाव्याची प्रत व त्याच्या आवश्यक प्रती त्यानंतर तात्काळ सादर कराव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GUNARI SAMEER GOPAL
Date: 2025.09.03 17:41:51 +0530

(समीर गोपाळ गुणारी)

दिनांक – ०३.०९.२०२५ दिवाणी न्यायाधिश क.स्तर, आमगांव